जलसंपदा विभागातील क्षेत्रीय आस्थापनेवरील नामनिर्देशनाच्या कोटयातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या संवर्गाची पदे सरळसेवेने भरण्यासाठी राज्यस्तरीय निवड समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र राज्य
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : नियुक्ती-१११८/(१८५/२०१८)/आ (तांत्रिक)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०१ मार्च, २०१९

संदर्भ: १) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२०/आ.पु.क., दिनांक १६ मे, २०१८,
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.प्रानिमं-१२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ, दि.१३ जून, २०१८.
३)सामान्य प्रशासन विभाग(माहीती तंत्रज्ञान)शासन निर्णय क्र.मातंसं-०८८/२७/२०१६-DIR IT(MH), दि.१९ सप्टेंबर, २०१७

प्रस्तावना :-

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी त्यांना अत्यावश्यक नागरी सुविधा व ग्रामिण भागात आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने विविध विभागातील महत्वाच्या सेवेशी निगडित असलेल्या पदांची विशेष भरती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.जलसंपदा विभागाच्या विद्यमान आकृतीबधांनुसार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदाची विशेष भरती करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने जलसंपदा विभागातील क्षेत्रीय आस्थापनेवरील नामनिर्देशनाच्या कोटयातील कनिष्ठ अभियंता(स्थापत्य) गट-ब(अराजपत्रित) या संवर्गाची पदे सरळसेवेने भरण्याच्या कामात एकसूत्रता, नि:पक्षपातीपणा व समान दर्जा राखणे आणि उमेदवारांना समान संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने पदभरतीच्या कार्यपध्दतीसंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित केलेले एकत्रित आदेश विचारात घेऊन राज्यस्तरीय निवड समिती गठीत करणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक १३/०६/२०१८ च्या शासन निर्णयान्वये नामनिर्देशनाच्या कोटयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील पदे सरळसेवेने भरताना अनुसरावयाची कार्यपध्दती निश्चित केली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील नामनिर्देशनाच्या कोटयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्यासाठी (अ) जिल्हा निवड समिती व (ब) प्रादेशिक व राज्यस्तरीय निवड समित्या स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.सदर सुचना विचारात घेऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी त्यांना अत्यावश्यक नागरी सुविधा व ग्रामिण भागात आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदाच्या विशेष भरतीकरीता खालीलप्रमाणे राज्यस्तरीय निवड समिती गठीत करण्यात येत आहे :-

अ.क्र.	नाव	पदनाम व कार्यालयाचे नाव	समितीतील पदनाम
१	श्री.वि.गि.राजपूत	मुख्य अभियंता (विनिर्दिष्ट प्रकल्प)जलसंपदा विभाग,पुणे	अध्यक्ष
२	श्री.सं.दे.कुलकर्णी	मुख्य अभियंता,तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव	सदस्य
३	श्री.अ.प्र.कोहीरकर	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद	सदस्य
४	श्री.रा.वि.जलतारे	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,(विशेष प्रकल्प)अमरावती	सदस्य
५	श्री.अ.रा.कांबळे	मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, नागपूर **अ.जा./अ.ज./इ.मा.व.या प्रवर्गातील अधिकारी(गट-अ)**	सदस्य
६	श्रीम.स.चं.बोधेकर	अधिक्षक अभियंता,दक्षता पथक,ठाणे **माहिला अधिकारी (गट-अ)**	सदस्य
७	श्री.जि.मो.शेख	अधिक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर **अल्पसंख्यांक प्रतिनिधी गट-अ मधील अधिकारी**.	सदस्य
८	श्री.बा.ज.गाडे	अधिक्षक अभियंता व संचालक,पाटबंधारे व संशोधन व विकास संचालनालय,पुणे.	सदस्य सचिव

२. जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय आस्थापनेवरील नामनिर्देशनाच्या कोटयातील कनिष्ठ अभियंता, गट-ब (अराजपत्रित) या संवर्गातील सरळसेवेने पदे भरण्याच्या अनुषंगाने या पदाची बिंदुनामावली तयार करुन ती सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचेकडून तपासून घेवून जातीनिहाय आरक्षण निश्चित करण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येईल. त्यानंतर संदर्भ क्र.२ वरील सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १३ जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार तसेच खालील अटी व शर्तींचे पालन करुन भरती प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी समितीची असेल :-

(१) नामनिर्देशनाच्या कोटयातील कनिष्ठ अभियंता, गट-ब (अराजपत्रित) या संवर्गातील रिक्त पदे भरतीप्रक्रिया राबवितांना समितीने स्पर्धा परिक्षांसाठी “महापरिक्षा पोर्टल ”चा वापर करावा,याकरिता या समितीस समन्वय समिती (Nodal Agency) म्हणून तसेच निवड समितीच्या अध्यक्ष/सदस्य सचिवांना समन्वय अधिकारी (Nodal Officer) म्हणून प्राधिकृत करण्यात येत असून त्यांनी यासंदर्भात संदर्भ क्र. ३ वरील सामान्य प्रशासन विभागाच्या (माहीती तंत्रज्ञान) दि.१९.०९.२०१७ च्या शासन निर्णय व त्यासोबतच्या परिशिष्ट क्र.१ ते ४ मधील निदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी

(२) सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त दि.१९.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार केल्या जाणाऱ्या कार्यवाहीसंदर्भात काही आक्षेप उद्भवल्यास त्यांचे निराकरण करण्याची जबाबदारी ,जी कार्यवाही महापरिक्षा पोर्टलच्या अखत्यारित येत असेल त्याबाबतीत महापरिक्षा कक्षाची राहील आणि जी कार्यवाही समितीच्या अखत्यारित येत असेल त्याबाबतीत समितीची राहील.

(३) "महापरिक्षा पोर्टल "च्या प्रत्यक्षात वापरासाठी /त्यासंबंधातील शंकांच्या निरसनासाठी महाआयटी महामंडळाव्दारे स्थापित महापरिक्षा कक्षाच्या प्रकल्प व्यवस्थापकांशी पुढील ई-मेल आयडी वर संपर्क करावा :-

Project Manager -1 Maha pariksha Cell pm 1.mahapariksha@mahait.org
Project Manager -1 Maha pariksha Cell pm 2.mahapariksha@mahait.org

३. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०११२१८२१०७२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Kiran Shantaram Parab

Digitally signed by Kiran Shantaram Parab
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=235425ab45ace1df268fe006b80c5cf93af9396efa01db7b8f3ae405e79ae523, cn=Kiran Shantaram Parab
Date: 2019.03.01 12:22:28 +05'30'

(कि.शां.परब)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
६) मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) सर्व विभागीय आयुक्त,
९) सर्व जिल्हाधिकारी,
१०)सर्व सहसचिव / उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग
१२) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
१३) सामान्य प्रशासन विभाग/का.क्र.१२, मंत्रालय, मुंबई
१४) वित्त विभाग/ आ.पु.क., मंत्रालय, मुंबई
१५) निवड नस्ती.